# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका, नागपूरचे क्षेत्रफळ 217 sqm असून
**{उद्यान व वृक्ष सं. विभाग}** नागपूर म.न.पा. चे सद्यस्थितीत विविध ठिकाणी 10 झोन आहेत. या दहा झोनमध्ये म.न.पा.च्या विविध ठिकाणी 182 उद्याने आहेत. तसेच येत्या आर्थिक वर्षात 2023-24 मध्ये नवोत 5 उद्याने तयार होणार आहेत. उद्यान विभागात एकुण 273 कर्मचारी होते या पैकी सध्या कार्यरत 51 कर्मचारी आहे त्यापैकी इतर विभागात 30 कर्मचारी काम करत असून यांचा पगार उद्यान विभागातुन देण्यात येतो उद्यान विभागात फक्त 21 कर्मचारी काम करत असून 222 पदे रिक्त आहे.

सद्यस्थितीत उद्यान विभागात एकच उद्यान पर्यवेक्षक (कंत्राटी) कार्यरत असल्यामुळे संपूर्ण उद्यानाची कामे झोन निहाय कंत्राटदाराकडून योग्य रितीने पूर्ण करणे शक्य होत नसल्यामुळे, उद्यान विकास, देखभाल, वृक्ष संरक्षण व संवर्धन, रोपवाटीका व्यवस्थापन क्षेत्रात कामाचा खोळंबा होत असल्यामुळे, शासनाच्या वृक्षरोपणाच्या मोहिम करिता रोपे तयार करणे, वृक्षरोपणाकरिता मोकळी जागा निश्चित करणे, विविध ठिकाणी विभागाने आयोजित केलेले वृक्षरोपणाची कामे पार पाडणे व वर्षभर लागवड करण्यात आलेल्या झाडांना टँकरने पाणी पुरवठा करणे, यासोबतच शहरातील धोकादायक झाडे, झाडांचे निरीक्षण करून अपघात होऊ नये, पावसाळयात उन्मळून पडलेली झाडे व झाडांच्या झुकलेल्या फांदया, विद्युत तारेवर, विद्युत लाईटवर, रोडवर व घरावर झुकलेली झाडांचे व झाडांच्या फांदयांचे निरिक्षण करणे इत्यादी कामे करण्याकरिता ३ उद्यान पर्यवेक्षक घेण्याकरिता मे, जे एन्ड जे कन्सल्टंसी सर्विसेस यांना मंजूर दरावर 11 महिन्याकरीता मुदतवाढ करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 438/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 03/12/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, उद्यान व वृक्ष संवर्धन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूरचे क्षेत्रफळ 217 sqm असून नागपूर म.न.पा. चे सद्यस्थितीत विविध ठिकाणी 10 झोन आहेत. या दहा झोनमध्ये म.न.पा.च्या विविध ठिकाणी 182 उद्याने आहेत. तसेच येत्या आर्थिक वर्षात 2023-24 मध्ये नवोत 5 उद्याने तयार होणार आहेत. उद्यान विभागात एकुण 273 कर्मचारी होते या पैकी सध्या कार्यरत 51 कर्मचारी आहे त्यापैकी इतर विभागात 30 कर्मचारी काम करत असून यांचा पगार उद्यान विभागातुन देण्यात येतो उद्यान विभागात फक्त 21 कर्मचारी काम करत असून 222 पदे रिक्त आहे.

सद्यस्थितीत उद्यान विभागात एकच उद्यान पर्यवेक्षक (कंत्राटी) कार्यरत असल्यामुळे संपूर्ण उद्यानाची कामे झोन निहाय कंत्राटदाराकडून योग्य रितीने पूर्ण करणे शक्य होत नसल्यामुळे, उद्यान विकास, देखभाल, वृक्ष संरक्षण व संवर्धन, रोपवाटीका व्यवस्थापन क्षेत्रात कामाचा खोळंबा होत असल्यामुळे, शासनाच्या वृक्षरोपणाच्या मोहिम करिता रोपे तयार करणे, वृक्षरोपणाकरिता मोकळी जागा निश्चित करणे, विविध ठिकाणी विभागाने आयोजित केलेले वृक्षरोपणाची कामे पार पाडणे व वर्षभर लागवड करण्यात आलेल्या झाडांना टँकरने पाणी पुरवठा करणे, यासोबतच शहरातील धोकादायक झाडे, झाडांचे निरीक्षण करून अपघात होऊ नये, पावसाळयात उन्मळून पडलेली झाडे व झाडांच्या झुकलेल्या फांदया, विद्युत तारेवर, विद्युत लाईटवर, रोडवर व घरावर झुकलेली झाडांचे व झाडांच्या फांदयांचे निरिक्षण करणे इत्यादी कामे करण्याकरिता ३ उद्यान पर्यवेक्षक घेण्याकरिता मे, जे एन्ड जे कन्सल्टंसी सर्विसेस यांना मंजूर दरावर 11 महिन्याकरीता मुदतवाढ करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.